**महाराष्ट्र शासन**

उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

ग्राम विकास व जलसंधारण विभाग महाराष्ट्र राज्य

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यवतमाळ

**<u>कार्यालयीन कामासाठी वाहन भाडेतत्वावर घेण्याबाबत</u>**

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसाहयाने पं. दीनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजना ( राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची ) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणी जिल्हा स्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यवतमाळ येथे कार्यालयीन कामकाजासाठी प्रवाशी वाहतूक परवाना असलेले एक स्कर्पीओ / बोलेरो किंवा समतुल्य वाहन मासिक व गरजेनुसार लागणारी वाहने एका वर्षाकरिता भाडेतत्वावर घेणे आहे. त्याकरिता वाहन पुरवठादार / एजन्शी यांच्याकडून ई- निविदा प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी वाहन पुरवठादार / संस्था यांच्याकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१) ( Dgital Sighnature Certificate ) २) https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर/पोर्टल वर नोंदणीकृत असावा. ३) स्वतःच्या नावावर कमीत कमी १ प्रवाशी वाहतूक परवाना असलेले व सन जानेवारी २०१८ नंतर नोंदणीकृत असलेले वाहन असावे . ४) Shop Establishment Act अंतर्गत नोंदणीकृत असावी. .५)PAN कार्ड असावे. ६) भाडोत्री वाहन पुरवठा करण्याचा कमीत कमी १ वर्षाचा अनुभव असावा.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक वाहन पुरवठादार यांनी त्यांच्या https://mahatenders.gov.in वर नोंदणीकृत केलेले तसेच वर नमूद केलेल्या कागदपत्रासह दि.०९/०३/२०२० दुपारी ५.०० वाजेपर्यंत निविदा भरण्यात याव्या. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या निविदेचा सदर ई - निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग करून घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

स्वाक्षरी

जिल्हा अभियान व्यवस्थापक

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान

जिल्हा परिषद, यवतमाळ.